## 'महात्मा जोतिबा फुले आणि समकालीन विचारवंतांचे तत्त्वज्ञानातील योगदान' या विषयावर १ आणि २ मार्च रोजी राष्ट्रीय चर्चासत्र

मुरबाड तालुक्यातील शिवळे येथील जनसेवा शिक्षण मंडळ, संचलित शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीराम पवार वाणिज्य कॉलेज, शिवळे व नवी दिल्ली येथील आय.पी.सी.आर. संस्थेच्या विद्यमाने 'महात्मा जोतिबा फुले आणि समकालीन विचारवंतांचे तत्त्वज्ञानातील योगदान' या विषयावर १ आणि २ मार्च रोजी राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले.

परिसंवादाचे उद्‌घाटन लोणी येथील प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी ' महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वरती आपले विचार प्रगट केले व सर्व शोधनिबंध वाचकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभाग आणि नवी दिल्लीतील 'आय.सी.पी.आर .'च्या सदस्य डॉ. नमिता निंबाळकर या पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी सर्व चर्चासत्रातील आलेल्या मान्यवरांना अशा प्रकारचे सेमिनार आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन दिले व मार्गदर्शन केले. अ अध्यक्षस्थानी जनसेवा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार गोटीराम पवार हे उपस्थित होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात 'भारताच्या इतिहासाचे अनेक पैलू आणि अनेक टप्पे आहेत, त्यातला एक महत्त्वाचा टप्पा म्हणजेच भारताच्या इतिहासातला समकालीन कालखंडाचा टप्पा होय. अशा या कालखंडावर प्राचीन भारतीय संस्कृतीचा, मुघल संस्कृतीचा आणि त्यानंतर युरोपियन संस्कृतीचा प्रभाव देखील प्रभाव पडला. परिणामी या कालखंडामध्ये धर्म, अध्यात्म, शिक्षण, राजकारण, समाज या सर्व क्षेत्रांमध्ये एक प्रकारची विविधता दिसून आली. खऱ्या अर्थाने या सर्व समकालीन विचारवंतांच्या विचार व कार्यातूनच आजचा हा आपला भारत विश्व गुरु बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. तेव्हा अशा या सर्व समकालीन विचारवंतांच्या विचार व कार्याला उजाळा देण्याच्या अनुषंगाने या दोन दिवशीय परिसराच्या आयोजन करण्यात येत आहे. तसेच मुरबाडचे समाजसेवक व मुंबईचे शिल्पकार नाना शंकर शेठ यांच्या सामाजिक, राजकीय कार्याची माहिती दिली. या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रासाठी महाराष्ट्र व अन्य राज्यातील सहभागी प्राध्यापकांनी निबंधवाचन केले. एकूण निबंध 90 पेक्षा जास्त होते. या शोधनिबंधाची स्मरणिकाही प्रकाशित करण्यात आली. या चर्चासत्रात डॉ. सुरेन्द्र गायधने (नागपूर), डॉ. आकाश सदानंद नाईक (पणजी), डॉ. आय. एस. कुंभार (बेळगाव), डॉ. कोकिला कालेकर (हैदराबाद), डॉ. अर्चना मलिक (मुंबई). डॉ. वेदप्रकाश डोणगावकर (वाशिम), प्राचार्य डॉ. बालाजी कांबळे (लातूर), डॉ. अतुल महाजन (नागपूर), डॉ. प्रभाकर कीर्तनकार (पूर्णा), डॉ. बाळासाहेब मुळीक (अकलूज), डॉ. मोनालिसा खानोरकर (लातूर) यांचे शोधनिबंध सादर झाले. सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. किरण सावे, (सोनोपंत दोडेकर महाविद्यालय, पालघर), मा. प्राचार्य बी.आर. हरड ( सहसचिव, जनसेवा शिक्षण मंडळ) हे उपस्थितीत होते.

हे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. गीता विशे यांनी मार्गदर्शन केले. या संपूर्ण चर्चा सत्राचे आयोजन, नियोजन डॉ. सुनिलदत्त गवरे, डॉ. संतोष पवार यांनी केले. हे चर्चासत्र यशस्वीपणे पार पडण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व प्रशासकीय कर्मचारी यांनी मेहनत घेतली.


भारतीय दार्शनिक अनुसंधान परिषद (ICPR) दिल्ली द्वारा प्रायोजित
वाणिज्य महाविद्यालय शिवळे
तत्वज्ञान विभाग
दीन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र
उद्घाटन समारंभ
GPS Map Camera
Shivale, Maharashtra, India
7F54+RX9, Shivale, Kondesakhare, Maharashtra 421401, India
Lat 19.25929°
Long 73.45752°
01/03/24 10:59 AM GMT +05:30
Google


वाणिज्य महाविद्यालय शिवळे
दीन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र
सांगता समारंभ
GPS Map Camera
Shivale, Maharashtra, India
7F54+RX9, Shivale, Kondesakhare, Maharashtra 421401, India
Lat 19.259389°
Long 73.457518°
02/03/24 03:16 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shivale, Maharashtra, India
7F54+RX9, Shivale, Kondesakhare, Maharashtra 421401, India
Lat 19.259448°
Long 73.457546°
01/03/24 12:25 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shivale, Maharashtra, India
7F54+RX9, Shivale, Kondesakhare, Maharashtra 421401, India
Lat 19.259379°
Long 73.457524°
01/03/24 12:10 PM GMT +05:30
Google


वाणिज्य महाविद्यालय शिवळे
तत्त्वज्ञान विभाग
दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र
शुक्रवार, दिनांक ०१ मार्च
व शनिवार ०२ मार्च २०२४
परिसंवाद - दुसरा